# चला ब्रिटन च्या राजकीय पटलावर.



ब्रिटीश : आपले पूर्वीचे राज्यकर्ते, लोकशाहीचे पुरस्कर्ते.

ह्या लेखातून त्यांची "प्रगत" लोकशाही व्यवस्था समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

गेले ३ आठवडे ब्रिटन मधे निवडणुकीचा प्रचार जोरात चालू आहे. १९९७ नंतर प्रथमच सत्तांतर होण्याची चिन्हे दिसत आहेत.


शिवनंदन पिंगळे

(केंब्रीज विद्यापीठ)

smp56@cam.ac.uk

# युनाइटेड किंग्डम : राष्ट्रीय निवडणूक, ६ मे , २०१०

प्रमुख राजकीय पक्ष: (ह्या ३ पक्षांना जवळपास ९०% मते मिळतात. )

(१) लेबर पार्टी ( सध्याचे सरकार, १९९७ पासून सत्तेवर)

मुख्य नेते : गोर्डन ब्राऊन, पीटर मॅनडेलसन, हरीएट हर्मन.

जुने नेते : टोनी ब्लेअर, क्लेमेंट आटली, जेम्ज़ केलघॅन.

(२) कन्सर्वेटिव पार्टी ( प्रमुख विरोधी पक्ष, १९७९ - १९९७ सत्तेवर होते)

मुख्य नेते : डेविड कॅमरॉन, विलियम हेग, जोर्ज ओसबोर्न.

जुने नेते : विन्सटन चर्चिल, मार्गारेट थॅंचर, जॉन मेजर, हॅरोल्ड मेक्मिलन.

(३) लिबरल डेमोक्रॅट्स ( गेले ६५ वर्षात सत्ता नाही)

मुख्य नेते : निक क्लेग, विन्स केबल , चार्ल्स केनेडी.

जुने नेते : डेविड स्टील, जेरिमी थोर्प.

ह्या व्यतिरिक्त स्कॉटलॅंड आणि वेल्स वर लक्ष केंद्रित करणारे क्षेत्रीय पक्ष सुद्धा कार्यरत आहेत. पण राष्ट्रीय निवडणुकीमधे त्यांचा प्रभाव फारसा नाही.

# पंतप्रधान पदाचे प्रमुख दावेदार.



श्री. गोर्डन ब्राऊन
(सध्याचे पंतप्रधान,
लेबर पार्टी, वय: ५९)



श्री. डेविड कॅमरॉन
उमेदवार: पंतप्रधान,
कन्सर्वेटिव पार्टी, वय: ४३)



श्री. निक क्लेग
(उमेदवार: पंतप्रधान,
लिबरल डेमोक्रॅट्स, वय: ४२)

# मुख्य मुद्दे :

(१) स्थलांतर: गेल्या ७ वर्षात रोमानिया , पोलंड, बल्गेरिया, असे देश युरोपियन यूनियन मधे दाखल झाले. त्यामुळे त्या देशातून एथे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. येथे केंब्रीज विद्यापीठामधे कॅन्टीन , स्वच्छता इत्यादी विभागात अनेक पोलिश, रोमेनियन लोक कामाला आहेत. त्यामुळे मजूर वर्गात स्पर्धा प्रचंड वाढली. आशियाई लोक (भारतीय, चीनी , कोरियन ) आल्यामुळे आणि आर्थिक मंदीमुळे देशाच्या काही भागात स्थानिक लोक अस्वस्थ झाले आहेत.

लेबर पार्टी: कुशल स्थलांतरित लोकांमुळे देशाला खूप फायदा झाला आहे. आम्ही अकुशल कामगारांचे स्थलांतर पूर्णपणे थांबवू. आणि आणि काही ठराविक क्षेत्रातच यापुढे कुशल कामगार येऊ शकतील.

कन्सर्वेटिव पार्टी : लेबर पार्टी मुळे स्थलांतर हाताबाहेर जात आहे. आम्ही या देशात वर्षात ठराविक लोकांनाच प्रवेश देऊ.

लिबरल डेमोक्रॅट्स : आम्ही इतर देशातील गुन्हेगारांना हाकलून लावू. पण एथे अनेक वर्षा राहणाऱ्या लोकांना सन्मानाने नागरिकत्व देऊ.

## मुख्य मुद्दे :

(२) अर्थव्यवस्था : ब्रिटनला जागतिक मंदीचा जबर फटका बसला. "नॉर्दर्न रोक" बँकेचे राष्ट्रीयीकरण करावे लागले. बेकारी ३० लाखापर्यंत पोहोचली. वित्तीय घाटा (फिस्कॅल डेफिसिट) फारच वाढला. वाहन निर्मिती, स्टील , फायनान्स आणि इतर अनेक क्षेत्रांना सरकारने मदत दिली. आता नव्या सरकारला वित्तीय घाटा कमी करणे आणि महत्वाच्या क्षेत्रात सरकारी खर्च वाढवणे अशी दुहेरी कसरत करावी लागणार आहे. कर आकारणीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल होण्याची गरज आहे. हे सगळे करत असताना (एन एच एस) "राष्ट्रीय आरोग्य सुविधा" अश्या महत्वाच्या सुविधांमधे सरकारी गुंतवणूक कमी करून चालणार नाही.

लेबर पार्टी : आर्थिक संकट हे जागतिक आहे आणि फक्त एका देशाला दोष देणे चुकीचे आहे. आम्ही अनेक महत्वाचे निर्णय घेतले आणि देशाला महासंकाटातून वाचवले. आता आपण मंदीतून बाहेर पडत आहोत आणि आम्हाला सध्याच्या परिस्थितीचे ज्ञान आहे. आम्हीच पुढील निर्णय घेऊन देशाला गतवैभव प्राप्त करून देऊ. आम्ही "राष्ट्रीय विमा कर" वाढवून वित्तीय घाटा कमी करू. बँकांवरील बंधने आधिक कडक करू. (एन एच एस ) "राष्ट्रीय आरोग्य सुविधा" अधिक बळकट करू आणि श्रीमंत लोकांचे कर वाढवू. गरीब / मध्यम वर्गाला असलेली करसवलत नक्की चालू ठेवू.

# मुख्य मुद्दे :

कन्सर्वेटिव पार्टी : १३ वर्षाच्या लेबर पार्टीच्या सत्तेमुळे आपला देशाच्या पाठीचा कणा मोडला आहे. अजुन ४ वर्षे त्यांना सत्ता दिली तर परिणामांना तयार राहा. अर्थव्यवस्था गंभीर परिस्थितीतून जात आहे. आम्ही "राष्ट्रीय विमा कर" अजिबात वाढवणार नाही कारण त्यामुळे उद्योगांवर विपरीत परिणाम होईल. कार्यक्षमता वाढवून आम्ही सरकारी खर्च कमी करू. उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करू. निर्मिती आणि सेवा ह्यांना चालणा देणारी धोरणे आम्ही अमलात आणू. सर्व जगाला एकत्र आणून आर्थिक धोरणे आखू. युरोप बरोबरचे राजकीय संबंध वाढवण्यात आम्हाला रस नाही.

लिबरल डेमोक्रॅट्स: गेले ६५ वर्षे ह्या दोन पक्षांची सत्ता आहे. तरीही आपल्या समाजात पुरेसा आर्थिक न्याय नाही. ब्रिटनला नवीन प्रकारच्या पारदर्शक राजकारणाची गरज आहे. आम्ही लोकांना वित्तीय घाटा कसा कमी करणार ह्याचा आराखडा दिला आहे. दोन्ही पक्षा बाता मारण्यात गुंग आहेत. आम्ही अफगाणिस्तान बरोबरचे युद्ध बंद करू आणि तो खर्च वाचवू. ६ वर्षात जनतेसाठी शिक्षण फुकट करू आणि स्वच्छ सरकार देऊ. काम न करणाऱ्या खासदारांना हाकलून देण्याचा हक्का जनतेला देऊ.

# मुख्य मुद्दे :

(३) अजून  काही महत्वाचे मुद्दे:

वाढती बेकारी, वाढता शिक्षणाचा खर्च, सरकारला जड जाणारी पेन्शन , वृद्ध लोकांना दिलेल्या आरोग्य  सुविधा, कर्करोगावर केले जाणारे संशोधन आणि कर्करोगग्रस्त  लोकांची विशेष काळजी.

अंतर्गत सुरक्षा, पोलिस विभागावर जास्त खर्च करणे, तरुण मुलांची व्यसने थांबवणे , तरुण लोकांना (१६ -२०)  शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करणे.

---

देशाच्या सीमा सुरक्षित करणे,  अवैध स्थलांतर पूर्णपणे थांबवणे, इराक  - अफगाणिस्तान मधील सैनिकांच्या परिवारांना विशेष सुविधा देणे.

पर्यावरण, उर्जा सुरक्षा, अणू-उर्जा वापरावी का नाही, युरोपला जोडणारे रेलवे जाळे.

# एक विलक्षण प्रसंग

प्रमुख नेत्यांना देशभर विविध ठिकाणी जाऊन मीडीया समोर सामान्य जनतेशी बोलावे लागते. गोर्डन ब्राऊन यांना एक चमत्कारिक अनुभव आला. लीड्स मधे एका महिलेने त्यांना अर्थ-व्यवस्थेबद्दल विचारले. त्यांनी नवीन नोकऱ्या निर्माण कशा करता येतील, महागाई कशी कमी होईल हे उत्तम प्रकारे सांगितले. यावर ती महिला म्हणाली " तुम्ही चांगले उत्तर दिले पण तुमच्या उत्तरा वर माझा विश्वास नाही." ब्राऊन म्हणाले " मॅडम, मला पुन्हा एकदा संधी द्या, मी तुमचा विश्वास संपादन करायचा नक्की प्रयत्न करेन".

डेविड कॅमरॉन यांना सुद्धा प्रचार करताना असे काही अनुभव आले. डेविड कॅमरॉन यांचा लहान मुलगा (इवन, वय: ७) प्रदीर्घ आजारामुळे मागच्या वर्षी वारला. एका माणसाने लंडन मधे त्यांना विचारले " तुमच्या मुलाला जशी उत्तम मेडिकल ट्रीटमेंट मिळाली, तशी माझ्या आजारी मुलाला मिळण्यासाठी तुम्ही पंतप्रधान झालात तर काय कराल?"

ही पारदर्शकता बघून मला धक्काच बसला.

या प्रसंगातून असे सिद्ध झाले कि येथे 'मायबाप सरकार' अशी संकल्पना नाहीये आणि सरकार हे जनतेसाठी आहे , जनता सरकारसाठी नाही हा विचार रुजलेला आहे.

# लोकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा/ वाद

ह्यावेळी प्रथमच वरील ३ मुख्य नेत्यांना टीव्ही चॅनेल्स वर एकमेकांसमोर उभे राहून साडेचार तास चर्चा करावी लागणार आहे. ही चर्चा ३ भागात (प्रत्येकी दीड तास) होईल.

पहिली फेरी : १५ एप्रिल (मुद्दे : गुन्हेगारी कमी करणे, कराची रचना बदलणे, परत आर्थिक मंदी पासून वाचवणे)

दुसरी फेरी : २२ एप्रिल (मुद्दे : परराष्ट्रीय धोरण , सुरक्षा आणि त्यावर होणारा खर्च, युरोप बरोबर चे संबंध )

तिसरी फेरी : २९ एप्रिल (मुद्दे : आर्थिक धोरण, वित्तीय घाटा कमी करणे, मंदीतून आर्थिक तेजीकडे वाटचाल, महागाई आणि व्याजाचे दर, अर्थव्यवस्थेमध्ये बँकांचे स्थान)

# लोकशाही पारदर्शक करण्याचे प्रयत्न

लोकशाही पारदर्शक करण्यासाठी सर्व पक्षांनी आपले भावी मंत्रीमंडळ आधीच नियुक्त केले आहे. उदाहरणार्थ , तिन्ही पक्षांनी भावी वित्तमंत्री कोण होणार हे आधीच ठरवले आहे.

लेबर पार्टी : आलिस्टर डार्लिंग (सध्याचे)

लिबरल डेमोक्रॅट्स: विन्स केबल


आणि कन्सर्वेटिव पार्टी : जोर्ज ओसबोर्न

महत्वाच्या पदांचे (दळणवळण , उद्योग, परराष्ट्रीय) दावेदार आत्ताच ठरले आहेत आणि देशभर या दावेदारांची लोकांसमोर चर्चा (वादविवाद) चालू आहे. यामुळे लोकांना त्यांच्या धोरणांची ( सक्षमता आणि कमतरता) समजत आहे आणि त्यानुसार जनतेचे मत बदलत आहे.

# मतदान आणि प्रचाराबद्दल माहिती.

- एकूण मतदारसंघ : ~ ६५०
- मतदानाचा दिवस जरी ६ मे असला तरी २/३ आठवडे आधी पोस्टाने मतदान करता येते.
- एथे ६ महिन्यापेक्षा जास्त राहिलेल्या कोणालाही मतदान करता येते.
- अनेक मतदार संघात ( ~ १००) भारतीय वंशाचे उमेदवार
- सध्याच्या १४८ खासदारांनी निवडणूक न लढावण्याचे ठरवले.
- तिषंकू (अनिर्णित) संसद असण्याची दाट शक्यता.

# मत - विभागणीचे अनुमान




पहिल्या फेरीच्या चर्चेनंतर (१५ एप्रिल) श्री. निक क्लेग (लिबरल डेमोक्रॅट्स) यांची आणि त्यांच्या पक्षाबद्दल उत्कंठा खूप वाढली. त्यांनी मांडलेली धोरणे आणि केलेली टीका लोकांना आवडली आणि त्यामुळे निवडणूक ३ घोड्यांची स्पर्धा झाली.

# शेवटचा टप्पा ( ६ मे ला मतदान)

गेले ३ आठवडे , बी बी सी , आय टीव्ही आणि स्काय अश्या वाहिन्यांवर अनेक नेत्यांच्या चर्चा जोरात चालू आहेत. परंतु पंतप्रधान पदासाठीच्या उमेदवारांच्या चर्चा जास्त गाजल्या. ह्या चर्चेमध्ये देशभरातील लोकांनी अतिशय उत्साहाने भाग घेतला आणि नेते मंडळींना कठीण प्रश्न विचारले. तिन्ही नेते बराच अभ्यास करून आले हो (मुख्यता अर्थव्यवस्था) आणि त्यांनी आपली धोरणे लोकांपुढे मांडली. इतर पक्षांच धोरणांवर टीका केली. गेला आठवडभर नेते मंडळी कारखाने, शाळा, हॉटेल्स, अश्या ठिकाणी जाऊन लोकांना त्यांच्या पक्षाला पाठींबा देण्याचे आवाहन करत आहेत.

थापा मारुन किवा क्षुल्लक मुद्दे उगाळुन एथे सत्ता मिळणे अशक्य आहे असे सर्वच नेत्यांना कळून चुकले आहे. आता ६ तारखेलाच सर्व नेत्यांचे आणि युनाइटेड किंग्डम चे भविष्य ठरेल.

शेवटी कुणीतरी सांगितलेच आहे, " नेहमी जनतेला त्यांच्या योग्यतेप्रमाणेच सरकार मिळेल "